## प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली
## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)
(०२३५८) २८२३८७

अंक १०/२०१७ दिनांक ०३/०२/२०१७ कालावधी ५ दिवस


**डॉ. उत्तम महाडकर,** विभाग प्रमुख, कृषिविद्या विभाग ९४२२७९१९९८

**डॉ. ज्ञानेश्वर जगताप,** नोडल ऑफिसर, कृषिविद्या विभाग ९४०३९८८१४३

**प्रा. वैभव राजेमहाडिक,** तांत्रिक अधिकारी, कृषिविद्या विभाग ९४२०६७३२६७


| मागील हवामान सारांश दि. ३०/०१/२०१७ ते ०३/०२/२०१७ | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | |
| पाऊस (मिमी) १/१/१६ पासून | : | |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | |
| कमाल तापमान (अं.से) | : | |
| किमान तापमान (अं.से) | : | |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | |

| हवामान पूर्वानुमान (०४/०२/२०१७ सकाळी ८:३० पासून ०८/०२/२०१७ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **हवामानांचे घटक** | : | ०४/०२ | ०५/०२ | ०६/०२ | ०७/०२ | ०८/०२ |
| पाऊस (मिमी) | : | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से) | : | २९ | २८ | २७ | २७ | २९ |
| किमान तापमान (अं.से) | : | १९ | १८ | १८ | १७ | १७ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | ० | ० | ० | १ | ० |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ४८ | ५८ | ५९ | ४६ | ४२ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | २५ | २९ | ४३ | २३ | २१ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ००४ | ००७ | ००६ | ००६ | ००५ |
| वाऱ्याची दिशा | : | नै.प. | नै.द. | नै.द. | नै.द. | नै.प. |

### :हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला:

**दिनांक ०७ फेब्रुवारी २०१७ रोजी अवकाश अंशतः मेघाच्छादित राहिल. दिनांक ०४ ते ०८ फेब्रुवारी २०१७ पर्यंत वाऱ्याचा वेग ४ ते ७ किमी प्रति तास राहिल.**

| पिक | पिक अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **चिकू** | वाढीची अवस्था | • चिकूवरील फळगळ या रोगाच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये (मेटालॅक्झिल ८ टक्के + मॅन्कोझेब ६४ टक्के) या संयुक्त बुरशीनाशकाचे ०.२ टक्के (२० ग्रॅम/१० लिटर पाणी) द्रावण संपूर्ण झाडावर फवारावे. |
| **नारळ/ सुपारी** | —— | • नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये शेणखताच्या खड्डयात दर दोन महिन्यांनी कार्बारील पावडरचे (१० लिटर पाण्यात २० ग्रॅम) मिश्रण तयार करून फवारावे.<br>• नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंग्यानी पाडलेली भोके १० टक्के कार्बारील भुकटी व वाळूने बुजवून घ्यावीत. तसेच खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटाच्या सहाय्याने १५ ते २० सें.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० मिली ३६ टक्के प्रवाही मोनोक्रोटोफॉस किंवा २० टक्के प्रवाही क्लोरोपायरीफॉस. २० मिली पाणी नरसळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे. |
| **भाजीपाला** | वाढीची अवस्था | • वांगी, मिरची, कोबी, नवलकोल इ. पिकांच्या रोपवाटीकेवर मावा, तुडतुडे, फुलकीडी यांचा प्रादुर्भाव दिसून येताच मॅलॅथिऑन (२० मिली प्रति १० लिटर पाण्यात) किंवा डायमिथोएट (१२ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात) मिसळून फवारावे.<br>• वांगी व मिरची यांची रोपे ५ ते ६ आठवडयाची झाली असल्यास त्यांची पूर्नःलागवड करावी. पूर्नःलागवड करतेवेळी रोपे डायमेथोएट १ मिली. प्रति लिटर पाण्याच्या द्रावणात ५ मिनिटे बुडवावीत व प्रत्येक ठिकाणी एकच रोप लावावेत. लागवड सरी वरंब्यावर करावी (६०X ६०सें. मी.). लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे. |
| **कलिंगड लागवड** | — | • कलिंगड पिकामध्ये मर (वेली संपूर्ण सुकून जातात) या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येताच, कार्बेन्डॅझिम १ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात वेलीच्या बुंध्याशी ओतावे.<br>• कलिंगड वेलीच्या सभोवती सुक्या गवताचे किंवा प्लॅस्टिकचे आच्छादन करावे. |
| **दुभती जनावरे /शेळया** | — | • जनावराना पाणी पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच गोठयामधे हवा खेळती राहिल याची काळजी घ्यावी.<br>• बहुवर्शीय स्वरुपाच्या वैरणीच्या पीकांची उदा. पॅरॅग्रास, यशवंत, नेपीयर इ. लागवड करावी.<br>• रात्रीच्यावेळी किमान तापमानात घट होत असल्याने जनावरांचे व पक्ष्यांचे थंडीपासून योग्य ते संरक्षण करावे. |
| **सुचना** | — | • निरनिराळे किडी, रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकच्या कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. |